सकाळ

कोरोनानंतर श्वसनमार्गातील बुरशींच्या रचनेत बदल

नीरीतील संशोधनाचा निष्कर्ष : विदर्भातील पाच जिल्ह्यांतील ९५ नमुन्यांचा अभ्यास

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २५ : कोरोना काळात घरीच उपचार घेऊन बरे झालेल्या रुग्णांच्या श्वसनमार्गातील बुरशींच्या रचनेत निरोगी व्यक्तींच्या तुलनेत लक्षणीय बदल झाल्याचे आढळून आले आहे. सीएसआयआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या (नीरी) शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासातून ही धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

कोरोनाचा संसर्ग आणि श्वसनमार्गातील बुरशी यांच्यातील संबंध तपासण्यासाठी हा अभ्यास

डॉ. खैरनार

डॉ. तोमर

करण्यात आला. नीरीचे वैज्ञानिक डॉ. सिद्धार्थ सिंग तोमर आणि डॉ. कृष्णा खैरनार यांनी विदर्भातील पाच जिल्ह्यांतील ९५ जणांच्या नमुन्यांचा अभ्यास केला. मानवी शरीरात अनेक प्रकारचे सूक्ष्मजीव असतात. त्यामध्ये जिवाणू आणि बुरशींचाही समावेश होतो. त्यापैकी काही सूक्ष्मजीव शरीराला त्रास देत नाहीत, पण काही विशिष्ट परिस्थितीत संसर्ग निर्माण करू शकतात. शरीरातील या सूक्ष्मजिवांचे संतुलन बिघडल्यास आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. या अभ्यासात कोरोना झालेल्या व्यक्तींच्या श्वसनमार्गातील बुरशींची विविधता आणि त्यांची रचना निरोगी व्यक्तींपेक्षा वेगळी असल्याचे दिसून आले. हा बदल शरीरातील सूक्ष्मजीवांच्या संतुलनात झालेल्या बदलाचा संकेत असू शकतो. मात्र, या बदलांचा आरोग्यावर नेमका किती परिणाम होतो, हे निश्चित करण्यासाठी अधिक संशोधन आवश्यक असल्याचे संशोधकांचे मत आहे.

बुरशीचे जनुक म्हणजे संसर्ग नव्हे

■ कोरोना रुग्णांच्या श्वसनमार्गात 'कॅन्डिडा ऑर्थोप्सिलोसिस', 'मॅलेसेझिया' आणि 'ॲस्परजिलस' या बुरशीचे प्रकार निरोगी व्यक्तींपेक्षा वेगळे आढळले. यांपैकी काही बुरशी गंभीर संसर्गाशी संबंधित असू शकतात. मात्र, बुरशीचे जनुकीय घटक आढळणे म्हणजे प्रत्यक्ष संसर्ग झाला, असा अर्थ नसल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले.

या जिल्ह्यांतून घेण्यात आले नमुने

■ विदर्भातील नागपूर, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यांतून मार्च-एप्रिल २०२३ या कालावधीत ९५ नमुने गोळा करण्यात आले. यामध्ये कोविडची लागण झालेल्या ४८ व्यक्ती आणि ४७ निरोगी व्यक्तींच्या नमुन्यांचा समावेश होता. रुग्णांवर रुग्णालयात उपचार झालेले नसल्याने औषधे आणि रुग्णालयातील संसर्गासारख्या घटकांचा परिणाम टाळून विषाणूशी संबंधित बदलांचा अभ्यास करण्यात आला.

Nagpur, Nagpur-Today
26/10/2026 Page No. 4